मराठा विद्या प्रसारक समाजाचे कला, विज्ञान व वाणिज्य - महाविद्यालय, ओझर (मिग) च्या वरीष्ठ महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीची सभा आज शुक्रवार दिनांक २७ मार्च २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयाचे सभागृहात संपन्न झाली. या सभेचे इतिवृत्त खालीलप्रमाणे -

सभेस खालील पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

| अ. क्र. | नांव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| १ | मा० श्रीमती निलिमाताई वसंतराव पवार | अध्यक्षा | Pawar |
| २ | मा. श्री. जसवंतराव जयराम गायकवाड | सदस्य | [signature] |
| ३ | मा. श्री. विठ्ठलराव त्र्यंबक चौधरी | सदस्य | [signature] |
| ४ | मा० श्री रत्नाकर विनायकराव कदम | सदस्य | [signature] |
| ५ | मा. श्री. चंद्रभान बाबुराव बोरस्ते | सदस्य | [signature] |
| ६ | मा. श्री. भास्करराव बबनराव गामणे | सदस्य | [signature] |
| ७ | मा. अरुण भाऊराव कदम | सदस्य | |
| ८ | मा. श्री. विष्णू कचरु शेजवळ | सदस्य. | |
| ९ | मा. श्री. रामनाथ कचरु वाबळे | सदस्य | R. K. [signature] |
| १० | मा० प्राचार्य डॉ० अर्जुन पंडित पाटील | सचिव | Patil |
| ११ | मा. प्रा. श्री. रमाकांत हंसराज ठाकरे | प्राध्यापक प्रतिनिधी | |
| १२ | मा. प्रा. श्री. प्रदीपकुमार रघुनाथ भदाणे | प्राध्यापक प्रतिनिधी | Bhadane |
| १३ | मा० प्रा. श्रीमती शकुंतला नाना पुरकर | प्राध्यापक प्रतिनिधी | Pukar [signature] |
| १४ | श्री. लक्ष्मण संत [illegible] | प्राध्यापकेतर प्रतिनिधी | [signature] |

विषय क्रं. १ : मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे
ठराव क्रं. १ :- मागील सभा दि. ६.८.२०१४ च्ये इतिवृत्ताचे वाचन समितीचे प्राध्यापक प्रतिनिधी श्री प्रदिपकु. रघुनाथ भदाणे यांनी केले. त्यावर साधक-बाधक चर्चा होवून इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

सुचक श्री भास्करराव बबनराव गायरवे.

अनुमोदक - श्री विठ्ठलराव चौधरी.

विषय क्रं. २ :- आर्थिक वर्ष सन २०१४-१५ मधील खर्चाचा आढावा घेणे.
ठराव क्रं० २ :- आर्थिक वर्ष सन २०१४-१५ मधील जमा रकमा व झालेल्या खर्चाचा तपशिल प्राचार्य डॉ० ए. पी. पाटील यानी सभेपुढे मांडला. खर्च वेळोवेळी संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या मान्यता व मंजूरी घेण्यात आलेल्या असल्या झालेला खर्च योग्य असल्याचे मत समिती सभासदानी मांडले. त्यावर चर्चा होवून आर्थिक व्यवहाराना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक - श्री चंद्रभान बोरसे.

अनुमोदक - श्री रामनाथ वाकळे.

विषय क्रं.-३ :- महाविद्यालयासाठी आवश्यक असलेले वाढीव इमारत बांधकाम करणेबाबत विचार-विनिमय करणे.
ठराव क्रं. ३ :- महाविद्यालयाचे दुसऱ्या मजल्याचे पूर्वेकडील वाढीव इमारत बांधकाम अंदाजे ६००० स्क्वे. फुट करणेबाबतच्या आवश्यकतेच्या

कार्यवाहीचा व संस्थेच्या इंजिनिअर्सनी दिलेल्या प्लॅन इस्टिमेटचा तपशील प्राचार्यांनी सभेपुढे मांडला. तातडीने बांधकाम सुरु करावे असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक - श्री रत्नाकर कदम

अनुमोदक - श्री चंद्रभान बोरस्ते

ठराव क्रं ४ :- महाविद्यालयाच्या शैक्षणिक अडीअडचणीबाबत विचारविनिमय करणे.

ठराव क्रं ४ :- महाविद्यालयाच्या शैक्षणिक व प्रशासकीय - अडीअडचणीबाबतची माहिती प्राचार्यांनी सभेपुढे मांडली. त्यात प्रामुख्याने अनुदानित विद्यार्थी संख्येवरील रिक्त प्राध्यापक व प्राध्यापकेतर पदांचा आढावा घेण्यात आला. शासन रिक्त जागा भरण्यास परवानगी देत नसल्याने संस्थेला घड्याळी तासावर शिक्षकांच्या नियुक्त्या करून आर्थिक बोजा सोसावा लागत आहे. त्यादृष्टीने शासनाकडे पाठपुरावा करून विहीत प्रक्रिया अवलंबून रिक्त जागा भरण्यात याव्यात असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक - डॉ. ए. पी. पाटील.

अनुमोदक - श्री. चंद्रभान बोरस्ते

सभेपुढे वेळेवरचा विषय न आल्याने उपस्थितांचे समितीचे प्राध्यापक प्रतिनिधी तथा उपप्राचार्य आर. एच. ठाकरे यांनी आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने कामकाज संपल्याचे जाहीर केले.

मंजूर १०/१०/२०१

Patil

डॉ. ए. पी. पाटील
प्राचार्य

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
...(पिंप्र) ता. निफाड, जि. नाशिक